# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---------------------------

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### सोमवार, दिनांक ०६ जुलै, २०२६ / आषाढ १५, १९४८ (शके)

| | | |
|---|---|---|
| (१) | जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री | |
| (३) | जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री | |
| (४) | शालेय शिक्षण मंत्री | |
| (५) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री | |
| (६) | पणन, राजशिष्टाचार मंत्री | |
| (७) | वस्त्रोद्योग मंत्री | |
| (८) | सहकार मंत्री | |

-----------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

-----------------------------

### शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा धरणाची गळती थांबविण्याबाबत

**(१) * ३३९४१ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा धरणावर जलसंपदा विभागाने कोट्यवधी रुपये खर्च करुनही धरणाची गळती थांबत नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने आतापर्यंत भातसा धरणाची गळती थांबविण्यासाठी किती रक्कम खर्च करण्यात आली आहे तसेच संबंधित ठेकेदार व जलसंपदा विभागाचे अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) सन २०१७ मध्ये भातसा धरणाची गळती पुर्ण संचय पातळीला ९८४५४ (लि./मीनिट) इतकी आढळून आली. त्यानुषंगाने आवश्यकतेनुसार सन २०१८-१९ मध्ये गळती प्रतिबंधक कामे करण्यात आली. तदनंतर गळती कमी होऊन सन २०२१ मध्ये सदर गळती ५०८४२ (लि./मीनिट) इतकी झाली होती. दरम्यान सन २०२० मध्ये दुरूस्ती कामे केंद्र शासनाच्या Drip-II या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली होती. परंतु निविदेवरील वाढीव देकार व इतर कारणास्तव गळतीप्रतिबंधक कामे करण्यात आली नाहीत. सद्यस्थितीत सदर गळती पूर्ण संचय पातळीला ९८००० (लि./मीनिट) इतकी आढळून आली असून धरणाची गळती प्रतिबंधक कामे विशेष दुरूस्ती अंतर्गत करण्याचे नियोजन आहे.

(२) व (३) भातसा धरणाच्या गळतीप्रतिबंधक उपाय योजनांचे काम हाती घेऊन आजपर्यंत रु.५१.५५ कोटी चा खर्च करण्यात आला आहे. भातसा धरणावर यापुर्वी करण्यात आलेली कामे ही ठरावीक मोनोलीथ वरच (Localised स्वरुपाची) करण्यात आलेली होती. संपुर्ण धरणावर सर्वसमावेशक स्वरुपाच्या गळतीप्रतीबंधक उपाययोजना न झाल्याने, कालानुरुप गळती वाढत गेली असून सन २०२५ मध्ये पुर्ण संचय पातळीला सुमारे ९८००० (लि./मीनिट) इतकी गळती निदर्शनास आली आहे.

धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने Upstream Treatment, Drilling व Grouting, VPD Cleaning तसेच इतर विशेष दुरुस्तीची कामे सर्वंकक्ष धरण सुरक्षा मुल्यांकन समितीच्या (Comprehensive Dam Safety Review Panel) भातसा धरणाच्या क्षेत्रीय पाहणी अहवालाच्या अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेली असून त्यासाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत रु.१९५.२७ कोटी किंमतीच्या प्रस्तावावर कार्यवाही प्रगतीत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सास्ती (राजुरा) कोळसा खाण कर्मचारी सहकारी पतसंस्थेतील आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(२) * ३५०१७ श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सास्ती (राजुरा) कोळसा खाण कर्मचारी सहकारी पतसंस्थेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार आणि सत्तेचा दुरुपयोग झाल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेच्या अध्यक्ष, व्यवस्थापक आणि संचालक मंडळाने संगनमताने बनावट कागदपत्रे तयार करून ७० लाख रुपयांहून अधिक रकमेचा अपहार केल्याचे लेखापरीक्षण (Audit) अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध लेखापरीक्षणात गंभीर ताशेरे ओढले असूनही अद्याप दोषींवर कायदेशीर कारवाई का करण्यात आली नाही,

(४) असल्यास, या संस्थेतील गैरकारभारामुळे सामान्य सभासदांमध्ये भिती व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अध्यक्ष, व्यवस्थापक व संचालक मंडळाला तात्काळ पदावरून निष्कासित करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासह पतसंस्थेतील सभासदांच्या ठेवी सुरक्षित ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

पतसंस्थेतील गैरव्यवहारातील संबंधित दोन व्यक्तींविरुध्द दिनांक १९.०६.२०२४ रोजी तसेच सात व्यक्तींविरुध्द दिनांक २४.०४.२०२६ रोजी पोलीस स्टेशन, राजूरा येथे एफ.आय.आर. (F.I.R.) दाखल करण्यात आले आहेत. तसेच ५ व्यक्तींविरुध्द एकूण रु.१,५९,३४,३१९/- इतक्या रकमेच्या वसूली करीता

दिनांक ३१.१०.२०२५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ९८ अंतर्गत वसूली प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे.
(४) हे खरे आहे.
(५) पतसंस्थेतील गैरव्यवहारातील संबंधितांविरुध्द (F.I.R.) दाखल करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८८ नुसार या प्रकरणी दिनांक ०६.०५.२०२६ रोजी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्यात आले असून त्यांच्याकडून चौकशीचे कामकाज सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्ह्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतील देयकांमध्ये झालेली अनियमितता

**(३) * ३६८६१ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) वाशिम जिल्ह्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (शालेय पोषण आहार) योजनेंतर्गत मागील सन २०१८ ते २०२५ या कालावधीत शासकीय व अनुदानित शाळांना पुरविण्यात येणाऱ्या तांदूळ वितरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता, बनावट सह्या, शिक्के व बनावट पावत्यांचा वापर झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने देयक वितरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणणे, शालेय पोषण आहार पुरवठादार संस्था ‘जगदंबा एंटरप्रायझेस, बीड’ यांच्याकडून अपहारित रकमेची वसुली तसेच, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या अनियमितता रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांनी चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधितांकडून रु.१,६२,१९,१७१/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच, वाशिम जिल्ह्याकरीता नियुक्त पुरवठेदार जगदंबा एंटरप्रायझेस, बीड यांना सन २०२६-२७ या वर्षाचे काम न देता सदरचे काम इतर संस्थेला देण्याचे प्रस्तावित आहे.
(४) अशा प्रकारची अनियमितता रोखण्यासाठी पुरवठादारासोबत करण्यात येणाऱ्या करारामध्ये आवश्यक अटी व शर्ती नमूद करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऊसतोड कामगारांची मुकादमांकडून होणारी आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी कायद्याच्या मसुद्यात सुधारणा करणेबाबत

**(४) * ३२३५८ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साखर गाळप हंगामात मुकादमांकडून ऊसतोड कामगार, शेतकरी व साखर कारखान्यांची उचल रक्कम न देता फसवणूक केल्याच्या घटना घडत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने ऊसतोड कामगार, मुकादम व वाहतूकदार यांच्यासाठी नवीन कायदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावित ‘ऊसतोड कामगार कायदा’ यामुळे वेठबिगारी कायदा, १९७६ अंतर्गत तरतूदीचे उल्लंघन टाळण्याबाबत सहकार मंत्री, आदिवासी मंत्री, सामाजिक न्याय मंत्री व संबंधित प्रशासनाचे सचिव यांच्याकडे समर्थन संस्थेने दिनांक ६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकारच्या फसवणुकीस आळा घालण्यासाठी मुकादमांना एक वर्षाचा कारावास व रुपये ५० हजार इतक्या दंडाची तरतूद असलेला स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय सहकार विभागाने घेतला आहे तसेच, प्रस्तावित कायद्यानुसार ऊसतोड कामगार, मुकादम व वाहतूकदार यांची नोंदणी सक्तीची करून त्यांच्या करारांची नोंद एका स्वतंत्र पोर्टलवर करण्याची तरतूद करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कायद्याच्या मसुद्यात सुधारणा करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीमार्फत कोणत्या प्रमुख सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत तसेच, सदर कायदा लवकरात लवकर लागू करून ऊसतोड कामगारांचे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी व फसवणुकीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.

साखर आयुक्तालयाने संकलित केलेल्या माहितीनुसार, गाळप हंगाम २०२१-२२ व २०२२-२३ या काळात एकूण १०,७१९ मुकादमांनी साखर कारखान्यांची आणि वाहतूकदारांची अंदाजे रु.५२०.७१ कोटी इतकी रक्कम बुडविल्याचे दिसून येते. तसेच गाळप हंगाम २०२४-२५ व २०२५-२६ या दोन हंगामात कारखाना तसेच मुकादमा विरोधात वाहतुकदारांच्या एकूण ४२२ तक्रारी प्राप्त असून १५५ तक्रारी विरोधात पोलीस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२), (३), (४) व (५) दि.०५.०३.२०२६ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार साखर कारखाना व्यवस्थापन, वाहतूकदार, मुकादम आणि ऊसतोडणी कामगार यांच्यातील अग्रीम वाटपाच्या आर्थिक व्यवहारास कायदयाचे स्वरुप देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी मा.मंत्री सहकार यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७.०३.२०२६ शासन निर्णयान्वये उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

सदर कायदयामध्ये प्रमुख समाविष्ट बाबी पुढीलप्रमाणे आहेत :-

पोर्टलच्या माध्यमातून ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूकदार व साखर कारखाने यांची नोंदणी करणे.

करारांचे कायदेशीर नियमन :- साखर कारखाना व्यवस्थापन, वाहतूकदार आणि मुकादम यांच्यातील आर्थिक व्यवहारांचे (अग्रीम/उचल रक्कम) करारात समावेश करून कायदेशीर नियमन करणे.

तक्रार निवारण कार्यप्रणाली :- मुकादमांकडून होणारा करारभंग आणि फसवणूक रोखण्यासाठी एक स्वतंत्र तक्रार निवारण कार्यप्रणाली विकसित करणे, ज्यामध्ये करारांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईची तरतूद असेल.

शासन स्तरावर या मसुद्याची तांत्रिक व कायदेशीर पडताळणी करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर, सदर कायदा तातडीने अंमलात आणण्यासाठी शासन स्तरावरून पुढील कार्यवाही केली जाईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी घालण्यात आलेल्या अटींबाबत

**(५) * ३४४३१ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तीन ते सहा महिन्यांची इंटर्नशिप अथवा अनुभव प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुभव प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेदरम्यान अनेक विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट कंपन्यांकडून अधिक मानधन, घरबसल्या काम व तात्काळ नियुक्तीची आमिषे दाखवून नोंदणी शुल्क, प्रशिक्षण शुल्क अथवा अनामत रक्कम आकारून आर्थिक फसवणूक केल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२४-२५ या कालावधीत देशभरात आर्थिक व सायबर फसवणुकीच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी नोंदविण्यात आल्या असून त्यामध्ये रोजगार व इंटर्नशिप संबंधित फसवणुकीचे प्रमाण लक्षणीय असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने इंटर्नशिप अथवा अनुभव प्रमाणपत्राच्या अनिवार्य अटीचा पुनर्विचार करण्यासाठी व विद्यार्थ्यांना सुरक्षित, प्रमाणित व पारदर्शक इंटर्नशिप उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) दि.०५.०२.२०२४ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयात Internship Cell स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच अधिकृत उद्योग व संस्थांशी सामंजस्य करार (MoU), डिजिटल पोर्टल, प्रशिक्षण व रोजगार कक्ष, मार्गदर्शन व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित, प्रमाणित व पारदर्शक इंटर्नशिप उपलब्ध होत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा उप निबंधक (सहकारी संस्था) व सचिव तथा सहाय्यक निबंधक यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(६) * ४११०८ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) आणि सचिव तथा सहाय्यक निबंधक यांच्याकडून जिल्हा केडर मधील गट सचिवांच्या हक्क रजेचा पगार, तालुका सचिवांचा ३० टक्के पगार केडर फंडातून देणे आणि भविष्य निर्वाह निधीची (PF) रक्कम दरमहा जमा न करता त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सहकार आयुक्त यांना गट सचिवांकडून दिनांक १३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या ५ वर्षांपासून गट सचिवांचा २ महिन्यांचा पगार, हक्काचा बोनस आणि ग्रॅच्युइटीची रक्कम थकवून ठेवण्यात आली आहे तसेच, सेवानिवृत्त झालेल्या दोन विशिष्ट सचिवांना नियमबाह्य रीतीने बोनस देणे आणि अपात्र सेवानिवृत्त सचिवांना लाचखोरीच्या माध्यमातून बेकायदेशीर मुदतवाढ (Extension) देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा केडरच्या सेवा ज्येष्ठता यादीत फेरफार करून गट सचिवांच्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर व नियमबाह्य बदल्या करण्यात आल्या आहेत तसेच, मागील ३ वर्षांपासून अनेक पात्र सचिवांचे वाढीव पेन्शन व नियमित पेन्शनचे प्रस्ताव जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवून मानसिक व आर्थिक छळ केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या सोलापूर या संस्थेच्या सचिवांना संस्थेचे सेवानियम क्र.१२ नुसार हक्क रजेचा पगार दिला जातो. विविध कार्यकारी सहकारी संस्थांकडून वसुल झालेल्या सभासद कर्जामधून सचिवाच्या वेतनासाठी लागणाऱ्या वेतनाच्या १.२५ पट (सव्वापट) किंवा वसुलीच्या २ % प्रमाणे पगार वर्गणीची रक्कम सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या., या संस्थेकडे वर्ग केली जाते. या रकमेतून सचिवांचे वेतन, हक्क रजा पगार, भविष्य निर्वाह निधी व सचिव सेवानिवृत्तीनंतर त्यांना दिली जाणारी ग्रॅच्युईटी रक्कम, इ. रक्कमा दिल्या जातात.

संस्थेच्या सचिवांना दिला जाणारा हक्क रजेचा पगार तसेच तालुका सचिवांना दिले जाणारे ३०% मानधन यासाठी लागणारा आवश्यक तो निधी विविध कार्यकारी सहकारी संस्थांकडून पगार निधीसाठी जमा होणाऱ्या रकमेतून केला जातो.

सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या. या संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या गटसचिवांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम, भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे RTGS द्वारे तसेच ऑनलाईन प्रणालीने पाठविली जाते. भविष्य निर्वाह निधीची रक्कम पाठविताना कोणताही व्यवहार रोखीने केला जात नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या., या संस्थेकडे गटसचिवांच्या पगारासाठी वर्ग झालेल्या पगार निधीतून संबंधीत गटसचिवांचा पगार व बोनस विहित वेळेत अदा केला जातो. गटसचिवांनी आवश्यक त्या कागदपत्रासह ग्रॅच्युईटी मिळणेबाबतचा प्रस्ताव सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या., या कार्यालयास सादर केल्यानंतर सदरचा प्रस्ताव मंजूरीसाठी भारतीय आयुर्विमा महामंडळ, कार्यालय, पुणे यांच्याकडे पाठविण्यात येतो व सदर मंजूरीनंतर ग्रॅच्युईटीची रक्कम संबंधीत सचिवांना चेकद्वारे तात्काळ दिली जाते. जिल्हा उपनिबंधक, सोलापूर कार्यालयाने कोणत्याही गटसचिवांचा पगार, बोनस व ग्रॅच्युईटीची रक्कम थकवून ठेवलेली नाही.

तसेच, जिल्हास्तरीय समितीने कोणत्याही सेवानिवृत्त सचिवाच्या मुदतवाढीस मान्यता दिलेली नाही.

(४) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या., या संस्थेच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये कोणताही फेरफार झालेला नाही. संबंधीत तालुक्याचे सहाय्यक निबंधक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संबंधीत वरिष्ठ बँक निरीक्षक व संबंधीत तालुक्याचे तालुका समन्वयक सचिव यांच्या शिफारसीसह गटसचिवांच्या बदलीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सचिवांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत व सदर बदल्यांना जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या., अंतर्गत कार्यरत असलेल्या व सेवानिवृत्त झालेल्या कोणत्याही गटसचिवाचा नियमीत पेन्शनचा प्रस्ताव सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या., या कार्यालयाकडे प्रलंबीत नाही. तसेच सेवानिवृत्त झालेल्या ज्या गटसचिवांनी वाढीव पेन्शनसाठी ऑनलाईन अर्ज केलेले होते त्यांच्या अर्जांवर भविष्य निर्वाह निधीच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

वाढीव पेन्शनची योजना ही दि. ०१.०९.२०१४ नंतर सेवा निवृत्त झालेल्या सचिवांसाठी आहे. तथापि, सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या., या कार्यालयास वाढीव पेन्शनसाठी प्राप्त ६८ सेवानिवृत्त सचिवांच्या प्रस्तावांपैकी ६५ सचिव हे दि. ३१.०८.२०१४ पूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत. उर्वरित ३ सेवानिवृत्त सचिवांच्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधीत सचिवांना सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या. सोलापूर या संस्थेने दि. १८.०२.२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवापूर (जि.नंदुरबार) येथील दादासो माणिकराव गावित या पंतसंस्थेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(७) * ३७५४२ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि. नंदुरबार) येथील दादासो माणिकराव गावित नागरी सहकारी पतसंस्थेने कर्ज मर्यादेचे उल्लंघन करून बेकायदेशीर कर्ज वाटप केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकार नियमानुसार एका कर्जदारास रक्कम रुपये २ लाख ५० हजारांची कर्ज मर्यादा असतांना रक्कम २० ते ३० लाख रुपयांचे कर्ज वितरीत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पतसंस्थेने अटी-शर्तींचे व नियमांचे पालन न करता एकाच कुटुंबातील सदस्यांना व इतर व्यक्तींना लाखो रुपयांचे कर्ज वितरीत केले आहे, सदर पतसंस्थेच्या व्यवस्थापनातील संचालक मंडळाच्या नातेवाईकांच्या नावावर कोट्यवधी रुपयांचे चुकीच्या पद्धतीने कर्ज देऊन मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याचा ठपका सहकार विभागाच्या प्राथमिक चौकशीत ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पतसंस्थेतील खातेदांराना त्यांच्या ठेवींची मुदत संपल्यानंतर देखील त्या वेळेवर परत केल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाच्या नियमानुसार दादासो माणिकराव गावित पतसंस्थेचे दरवर्षी शासनाकडून लेखापरीक्षण (Audit) केले जाते, हे ही खरे आहे काय,
(६) तसेच, जिल्हा उपनिबंधक (DDR), नंदुरबार यांचेकडे चौकशी अहवाल प्राप्त होऊनही संबंधित दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

पतसंस्थेच्या कर्जवाटपातील अनियमितता व सन २०२३ च्या लेखापरिक्षण अहवालावरील छानननी अहवाल व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने पतसंस्थेचे चाचणी लेखापरीक्षण करण्याचे आदेश दिनांक ०९.१२.२०२४ रोजी देण्यात आले. सदर आदेशात अंशत: बदल करुन दिनांक १०.११.२०२५ रोजी पुन्हा आदेश निर्गमित करण्यात आले असून पतसंस्थेचे चाचणी लेखापरिक्षण सुरु आहे.
(४) हे खरे नाही.

पतसंस्थेतील ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करणेबाबत कोणत्याही तक्रारी सहायक निबंधक अथवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदूरबार या कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.
(५) हे खरे नाही.

पतसंस्थांना वार्षिक सभेत ठराव करुन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी मान्यता दिलेल्या पॅनलवरील लेखापरिक्षकांची नियुक्ती करुन त्यांचेकडून लेखापरिक्षण करुन घेतात.
(६) सदर पतसंस्थेच्या सन २०२३ च्या लेखापरिक्षण अहवालावरील छानननी अहवाल व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने पतसंस्थेचे उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था, तळोदा यांचेकडून चाचणी लेखापरिक्षण सुरु असून सदर कामकाज अंतिम टप्प्यात आहे. चाचणी लेखापरिक्षणाचा अहवाल प्राप्त होताच पुढील उचित कारवाई करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील व्यावसायिक महाविद्यालयांच्या शुल्क वाढ प्रस्तावातील पारदर्शकतेबाबत

**(८) * ३९९२५ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता राज्यातील व्यावसायिक, अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन, फार्मसी,

आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट, कृषी व विधी महाविद्यालयांसह सुमारे २,३७५ महाविद्यालयांनी शुल्क वाढीसाठी प्रस्ताव शुल्क नियामक प्राधिकरणाकडे (एफआरए) सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एफआरएच्या नियमांनुसार शुल्क वाढ प्रस्ताव, आवश्यक कागदपत्रे व आर्थिक तपशील विद्यार्थी, पालक व प्राध्यापकांच्या माहितीसाठी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक असतानाही अनेक महाविद्यालयांनी केवळ संक्षिप्त माहिती प्रसिद्ध करून अथवा माहिती दुय्यम स्वरूपात उपलब्ध करून नियमांचे पालन न केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एफआरएच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांबाबत शुल्कात कपात अथवा अन्य दंडात्मक कारवाईची तरतूद असतानाही संबंधित महाविद्यालयांवर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, काही संस्थांकडून शुल्क वाढ प्रस्तावांमध्ये कर्मचारी संख्या, वेतनपत्रके, उपलब्ध शैक्षणिक सुविधा, व्यवस्थापन व एनआरआय कोट्यातील प्रवेश तसेच त्यातून प्राप्त झालेल्या शुल्काचा तपशील अपूर्ण अथवा चुकीचा सादर केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने एफआरएकडे सादर करण्यात आलेल्या सर्व शुल्क वाढ प्रस्तावांची सखोल पडताळणी करून नियमबाह्य, अपूर्ण अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर करणाऱ्या संस्थांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) तसेच, शुल्क निर्धारण प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करणे तसेच व्यवस्थापन व एनआरआय कोट्यातील प्रवेश व शुल्काची माहिती सार्वजनिक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता राज्यातील व्यावसायिक, अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन, फार्मसी, आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट, कृषी व विधी महाविद्यालयांसह सुमारे २४५६ प्रस्ताव शुल्क नियामक प्राधिकरणास (एफआरए) प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६ मधील कलम १४ मध्ये, प्रत्येक विनाअनुदानित संस्था, शुल्क नियामक प्राधिकरणाने मान्यता दिल्याप्रमाणे पाठ्यक्रम-निहाय शुल्क आणि शिर्ष-निहाय शुल्क (अंतिम किंवा यथास्थिती तात्पुरत्या शुल्कासह) सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याची तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये शुल्काबाबतची माहिती संस्थांनी प्रसिध्द न केल्याबाबतची तक्रार शुल्क नियामक प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

(४), (५) व (६) शुल्क निर्धारण प्रस्तावांमध्ये संस्थांकडून अपूर्ण अथवा चुकीची माहिती सादर केल्याबाबत प्राधिकरणाकडे ३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यावर प्राधिकरणामार्फत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(७) शुल्क नियामक प्राधिकरणाकडून दि.२४.०४.२०२५ व दि.१६.०७.२०२५ रोजी व्यवस्थापन व एन.आर.आय. कोट्यातील शुल्कासंदर्भात निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतच्या सूचना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

----------------

## राज्यातील विशेषत: सिंधुदुर्ग, गडचिरोली व रत्नागिरी जिल्ह्यांतील सीईटी नोंदणीचे प्रमाण कमी झाल्याबाबत

**(९) * ३३१३२ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली असून राज्यभरात एकूण १० लाख ७६ हजार ७०१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे, मात्र सिंधुदुर्ग (४,४२४), गडचिरोली (६,९४१) व रत्नागिरी (८,२८५) या जिल्ह्यांमध्ये नोंदणीचे प्रमाण तुलनेने अत्यल्प राहिल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण, दुर्गम व आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये नोंदणी कमी राहण्यामागे प्रवेश प्रक्रियेबाबत जागरूकतेचा अभाव, डिजिटल प्रक्रियांबाबत असलेला संभ्रम, माहितीची कमतरता तसेच कोचिंग व मार्गदर्शन सुविधांचा अभाव ही प्रमुख कारणे असल्याचे सीईटी कक्षाच्या प्राथमिक आढाव्यातून समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यांमध्ये कमी नोंदणी झालेले विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहू नयेत यासाठी विशेष मार्गदर्शन सत्रे, जनजागृती अभियान, शाळा-महाविद्यालय स्तरावरील समुपदेशन कार्यक्रम तसेच जिल्हानिहाय विशेष दौरे आयोजित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी एकूण १४,०८,०३१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली होती. तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता एकूण १८,१२,५६५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे.

सदर सामाईक प्रवेश परीक्षेसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नोंदणी संख्या सन २०२५ मधील ५,४८४ वरून सन २०२६ मध्ये ५,३२१ इतकी झाली असून त्यामध्ये १६३ इतकी घट झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यात नोंदणी संख्या ८,५२४ वरून ८,२५४ इतकी झाली असून त्यामध्ये २७० इतकी घट झाली आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील नोंदणी संख्या १०,०११ वरुन ९,९५९ इतकी झाली असुन, त्यामध्ये ५२ इतकी घट झालेली आहे.

(२) व (३) राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विद्यार्थी व पालकांना प्रवेश प्रक्रिया, नोंदणी, परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यासाठी विविध माध्यमांतून सातत्याने जनजागृती व मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच सामाजिक माध्यमे, वृत्तपत्रे व इतर प्रसारमाध्यमांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राज्यात एकूण ४० विद्यार्थी सहाय्यता केंद्रे उभारण्याचे काम सुरु असून, त्यापैकी २६ जिल्ह्यांमध्ये विद्यार्थी सहाय्यता केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत.

याशिवाय विविध जिल्ह्यांमध्ये मार्गदर्शनपर कार्यक्रम, ऑनलाईन बैठका, समाज माध्यमांद्वारे लाईव्ह प्रसारणे व समुपदेशन उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची प्रलंबित रक्कम वितरित करण्याबाबत

**(१०) * ३८८०८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च शिक्षण घेणारे सुमारे ५२ हजार ७९४ विद्यार्थी शासकीय शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप वितरित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्ती वितरण प्रक्रियेमधील त्रुटी दूर करून संबंधित विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत उच्च शिक्षण घेणाऱ्या खुला, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एकूण १४ शिष्यवृत्ती योजनांचे लाभ देण्यात येतात.

दि.२२.०६.२०२६ रोजीच्या महाडीबीटी पोर्टलवरील अहवालानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शिष्यवृत्तीचे ४०१४५ अर्ज पडताळणी अभावी प्रलंबित होते.

(२) व (३) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त १४ शिष्यवृत्ती योजना खुला, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पध्दतीने कार्यान्वित आहेत. संचालक उच्च शिक्षण यांचे स्तरावरून त्यांचे परिपत्रक दि.०७.०७.२०२५, दि.१५.०९.२०२५, दि.३०.१०.२०२५, दि.२५.११.२०२५, दि.३०.१२.२०२५ व दि.११.०२.२०२६ अन्वये प्रलंबित शिष्यवृत्तींचे अर्ज तातडीने पडताळणी करण्याबाबतच्या सूचना सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना देण्यात आल्या आहेत. दि.२२.०६.२०२६ रोजीच्या महाडीबीटी पोर्टल अहवालानुसार मागील तीन वर्षात प्राप्त अर्ज व वितरित निधी दर्शविणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | प्राप्त अर्ज | लाभार्थी विद्यार्थी | संस्था व विभाग स्तरावर प्रलंबित अर्ज | वितरित निधी (रू. कोटीमध्ये) |
|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | १९८९३५ | १७४१७५ | १६५६ | १६५.८१ |
| २०२४-२५ | २४७७२६ | २१२३२६ | ४५८४ | २४८.०३ |
| २०२५-२६ | २६१९१३ | १९४४०६ | ३३९०५ | ५४.८४ |
| एकूण | ७०८५७४ | ५८०९०७ | ४०१४५ | ४६८.६८ |

नविन शैक्षणिक वर्षापासून सुरू झालेले पोर्टल पुढील शैक्षणिक वर्षानंतर सुध्दा सुरू असते. त्यानुसार प्राप्त अर्जांची पडताळणी सुरू असते. ही प्रक्रिया निरंतर सुरू असणारी प्रक्रिया असून प्रलंबित अर्जांची जलदगतीने पडताळणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाळांच्या नावांमध्ये इंटरनॅशनल, ग्लोबल, युनिव्हर्सल इत्यादी शब्दांच्या वापराबाबत जारी करण्यात आलेल्या सुधारित नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत

**(११) * ३३१०६ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन शाळा सुरू करताना अथवा विद्यमान शाळांच्या नावांमध्ये 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'युनिव्हर्सल' यांसारख्या शब्दांचा वापर करून पालक व विद्यार्थ्यांची दिशाभूल होऊ नये यासाठी राज्य शासनाने दिनांक २ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान सुधारित नियमावली जारी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियमावलीनुसार शाळा ज्या शैक्षणिक मंडळाशी संलग्न आहे, त्या मंडळाचा उल्लेख शाळेच्या नावात करणे अनिवार्य करण्यात आले असून केवळ संबंधित आंतरराष्ट्रीय मंडळाशी प्रत्यक्ष संलग्न असलेल्या शाळांनाच विशिष्ट शब्द वापरण्याची मुभा देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'सैनिक शाळा' व 'कॉन्व्हेंट' या शब्दांच्या वापराबाबतही स्वतंत्र निकष निश्चित करण्यात आले असून सदर निकषांची पूर्तता न करणाऱ्या शाळांवर कारवाईचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शाळेच्या नावावरून दिशाभूल करणाऱ्या संस्थांवर ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे तसेच या नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी व चुकीची नावे बदलण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शाळा ज्या शैक्षणिक मंडळाशी संलग्न आहे त्या मंडळाचा उल्लेख शाळेच्या नावात करणे अनिवार्य नसून संबंधित शैक्षणिक मंडळाचा उल्लेख करणेची बाब ऐच्छिक स्वरूपाची आहे.

तसेच, शाळेच्या नावातील दिशाभूल करणारे शब्दास प्रतिबंध करणेच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मंडळाशी संलग्न होण्यास इच्छूक असलेल्या शाळांनी, शाळेच्या नावात "इंटरनॅशनल", "ग्लोबल", "युनिव्हर्सल" यासारखे शब्द वापरणेस मुभा दिली आहे.

तसेच, सैनिकी शाळा म्हणून मान्यताप्राप्त शाळांना "सैनिकी" शब्दाचा वापर करणे व ख्रिस्ती धर्मसंघाद्वारे/ ख्रिश्चन नन्स (भिक्षुणी) समुदायाद्वारे स्थापित करण्यात येणाऱ्या शाळांनाच "कॉन्व्हेंट" शब्दाचा वापर करणेची मुभा आहे.

(४) व (५) सदर शासन निर्णय हा भूतलक्षी प्रभावाने लागू करण्यात आलेला नसून यापुढे स्थापित करण्यात येणाऱ्या शाळांनी, दिशाभूल करणारे शब्द शाळेच्या नावात वापरू नयेत, याकरीता सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) येथील संचालक मंडळाने सूतगिरणीच्या बांधकामात केलेला गैरव्यवहार

**(१२) * ४१११५ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वस्त्रोद्योग महासंघ व राज्याच्या वस्त्रोद्योग विभागाने निर्गमित केलेल्या विविध परिपत्रकानुसार सहकारी तत्त्वावरील सूतगिरणीचे बांधकाम क्षेत्र ११५९५.१० चौरस मीटर असणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंगसाजी महाराज सहकारी सूतगिरणी मर्या. चिखली, जिल्हा बुलढाणा या संस्थेने केवळ ६००० चौरस मीटर बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सूतगिरणी इमारतीच्या बांधकामाचा निधी रामकृष्ण परमहंस मौनी बाबा शिक्षण संस्थेच्या विविध शैक्षणिक इमारतीच्या बांधकामाकरीता वापरून शासनाच्या निधीचा अपहार करून शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी सदर सूतगिरणीच्या संचालक मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचेकडून अपहारीत रक्कमेची दंडनीय व्याजासह वसूली करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत संबंधित सूतगिरणीच्या संचालक मंडळावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सूतगिरणीने ७१०३.०० चौ.मी. बांधकाम केले आहे.

(३), (४) व (५) मुंगसाजी महाराज सहकारी सुतगिरणी मर्या., चिखली, जि. बुलडाणा या सूतगिरणीच्या व्यवस्थापनाने बांधकाम करतांना केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करणेबाबत श्री. शैलेंद्र गोंधणे यांनी दि.०९.१२.२०२५ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वस्त्रोद्योग आयुक्तालयाने दि.१७.१२.२०२५ रोजी चौकशी करणेबाबत कार्यकारी अभियंता, वस्त्रोद्योग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली.

तसेच नमूद सूतगिरणीच्या संबंधात एकूण २१ मुद्यांच्या अनुषंगाने श्री. सुभाष ठेंगे यांच्या दि.१५.०५.२०२५ रोजीच्या तक्रारी नुसार चौकशी करणेबाबत वस्त्रोद्योग आयुक्तालयाने दि.१६.०२.२०२६ रोजी कार्यकारी अभियंता, वस्त्रोद्योग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीकडे कामकाज वर्ग केले.

उपरोक्त दोन्ही तक्रारी सबंधाने समितीने सादर केलेल्या दि.९/६/२०२६ रोजीच्या अहवालात श्री मुंगसाजी महाराज सहकारी सूतगिरणी मर्या. चिखली, ता.चिखली, जि.बुलढाणा या सूतगिरणी संदर्भात प्रथमदर्शनी आक्षेपार्ह बाबी आढळुन आल्याने यावर विस्तृत चौकशी होण्याचे दृष्टिने तसेच सूतगिरणीवर पुढील वैधानिक कार्यवाही करणे आवश्यक असल्याने वस्त्रोद्योग आयुक्तालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (३)(क) अंतर्गत दि.१६/६/२०२६ अन्वये सूतगिरणीचे चाचणी लेखापरिक्षणाचे आदेश निर्गमित केले असून सदरहु चाचणी लेखापरिक्षणाकरिता विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (सूतगिरण्यां), वस्त्रोद्योग, आयुक्तालय नागपूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच सूतगिरणीला मिळालेले शासकिय अर्थसहाय्य वसुली करिता सूतगिरणीच्या ७/१२ वर रु.५३,८५,५२,७१२/- इतका बोजा चढविण्यात आलेला आहे.

चाचणी लेखापरिक्षण अहवाल प्राप्त होताच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम व १९६१ चे नियमानूसार नमूद सूतगिरणीवर वैधानिक कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी प्रक्रिया 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाईन सुरू केल्याबाबत

**(१३) * ३७२८५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी प्रक्रिया अधिक वेगवान, सुटसुटीत आणि पारदर्शक करण्यासाठी सहकार विभागाने 'आपले सरकार' पोर्टलवर पूर्णपणे ऑनलाईन प्रणाली सुरू केल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृहनिर्माण संस्थांच्या नोंदणीसाठी लागणाऱ्या अनिवार्य कागदपत्रांची संख्या तब्बल २९ वरून १९ पर्यंत कमी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरी भागांतील हजारो विना नोंदणीकृत इमारती आणि सोसायट्यांचा प्रलंबित प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, सोसायट्यांना त्यांच्या अस्तित्वात असलेल्या उपनियमांमध्ये ऑनलाईन सुधारणा करण्याची सुविधा मिळणार आहे काय, आतापर्यंत किती संस्थांनी ऑनलाईन प्रणाली मध्ये नोंदणी केली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

विभागाने राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी प्रक्रिया आपले सरकार पोर्टल या ऑनलाईन प्रणालीवर दि. ०१ एप्रिल, २०२६ पासून उपलब्ध करुन दिली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

गृहनिर्माण संस्थांच्या नोंदणीसाठी लागणाऱ्या अनिवार्य कागदपत्रांची संख्या १६ पर्यंत कमी करण्यात आली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सदर ऑनलाईन प्रणालीव्दारे मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरी भागांतील अधिकृत बांधकाम असलेल्या इमारतींसाठी सहकारी संस्थांची ऑनलाईन नोंदणी करणे सोपे झाले आहे. तथापि, अनधिकृत इमारतींची संस्था नोंदणी कायदेशीर नसल्याने या ऑनलाईन प्रणालीतही अशा इमारतींबाबत सहकारी संस्था नोंदणी करता येणार नाही.

(४) होय.

सहकारी संस्थांच्या उपविधी दुरुस्तीसाठी ऑनलाईन प्रणाली आपले सरकार पोर्टलवर दि.१९ जून, २०२६ पासून उपलब्ध करुन दिलेली आहे.

तसेच, राज्यात दि. ०१ एप्रिल, २०२६ पासून ७६ संस्थांनी ऑनलाईन प्रणाली मध्ये नोंदणी केली आहे.

(५) संस्था नोंदणीचे प्रस्ताव व उपविधी दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारावेत अशा सूचना सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी त्यांच्या दि.०१.०४.२०२६ व दि.२४.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयांना दिल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धरणांवर भूकंपमापन यंत्रे कार्यरत करण्याबाबत

**(१४) * ३३६९४ श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.अभिमन्यु पवार (औसा), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक मोठया धरणांवर भूकंप मोजण्यासाठी आवश्यक असलेली भूकंपमापन यंत्रे कार्यरत नसल्याची धक्कादायक बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही ठिकाणी बसवलेली भूकंपमापन यंत्रे नादुरुस्त अवस्थेत असून त्यामध्ये अनेक वर्षांपासून दुरुस्ती किंवा बदल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील धरणांवर दुरवस्था झालेली भूकंपमापन यंत्रे कार्यरत करण्याबाबत किंवा ती नवीन बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत नाशिक, ईसापूर व कोयना येथे भूकंप मापन यंत्रे बसविण्यात आली आहेत. तसेच, सूर्या व भातसा या दोन धरणांवर स्ट्राँग मोशन ॲक्सेलरोग्राफ बसविण्यात आला आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

धरण सुरक्षितता कायदा-२०२१ नुसार राष्ट्रीय धरण सुरक्षितता प्राधिकरणाने दि. २४ एप्रिल, २०२४ प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनूसार १०० मी. व त्यापेक्षा जास्त उंचीच्या कोयना धरणावर भूकंपमापन यंत्र (Seismograph) व स्ट्राँग मोशन ॲक्सेलरोग्राफ व उर्वरित २०२ धरणांवर फक्त स्ट्राँग मोशन ॲक्सेलरोग्राफ बसविणेच्या नियोजनास (Roadmap) शासनाने दि. २८/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिली आहे.

सदर उपकरणांचे दर हे दरसूचीबाह्य दर असल्याने त्यांचे दर निश्चितीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेतील विलंबामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान

**(१५) * ४०४२५ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता दहावीच्या निकालानंतर इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेला होणाऱ्या विलंबामुळे विशेषतः NEET, JEE व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवेश प्रक्रियेतील विलंबामुळे विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना नियमित अध्यापन व अभ्यासक्रम सुरू करण्यास उशीर होत असून त्यांच्यावर अतिरिक्त शैक्षणिक ताण निर्माण होणे तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीत असमान परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर कालमर्यादेत, पारदर्शक व केंद्रीकृत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवून इयत्ता अकरावीचे शैक्षणिक सत्र माहे जुलै महिन्यातच नियमितपणे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) तसेच प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण होण्यासाठी प्रवेश वेळापत्रक, महाविद्यालयांची शैक्षणिक दिनदर्शिका, अभ्यासक्रम नियोजन व प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये आवश्यक बदल करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी दिनांक २७/०४/२०२६ ला शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे व त्याअन्वये मार्गदर्शन सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

इयत्ता १० वी चा निकाल जाहिर होण्यापूर्वी प्रवेशाची प्रक्रिया वेळेत पूर्ण होण्यासाठी दिनांक १० एप्रिल, २०२६ ते ०८ मे, २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग-१ भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली होती व त्यामुळे इयत्ता १० वी चा निकाल दिनांक ०८ मे, २०२६ रोजी जाहिर करण्यात आला त्यापूर्वी ७,७४,९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-१ भरलेला होता.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रकियेच्या ३ नियमित फेऱ्या दिनांक २५/०६/२०२६ रोजी पूर्ण झालेल्या आहेत. नियमित ३ फेऱ्या अंती एकूण ७,७८,२५५ विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश निश्चित केलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील साखर उद्योगांवरील आर्थिक संकट दूर करणेबाबत

**(१६) * ४१०५७ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने साखर निर्यातीवरील पूर्वपरवानगी मागे घेत निर्यातबंदी लागू केल्यामुळे राज्यातील साखर उद्योगासमोर आर्थिक संकट उभे राहिल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्यातबंदीच्या निर्णयामुळे सुमारे २० लाख टन साखर निर्यातीच्या प्रक्रियेत असताना प्रत्यक्षात केवळ ७ ते ८ लाख टन साखरेचीच निर्यात होऊ शकली असून उर्वरित लाखो टन साखर देशांतर्गत बाजारात अडकून पडल्याने साखरेचा शिल्लक साठा मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, साखर निर्यात अचानक थांबल्यामुळे साखर कारखान्यांचे संपूर्ण आर्थिक गणित बिघडले असून साठवणुकीचा खर्च वाढल्याने कारखानदारीसाठीच्या शासकीय योजना व निधीचा प्रभावी लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत आणि शेतकऱ्यांच्या ऊसाचा एफआरपी (FRP) पेमेंटवर याचा गंभीर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, साखर उद्योगावर आलेल्या आर्थिक संकटाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील साखर कारखान्यांना व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना या आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र सरकारने दि. १३ मे, २०२६ च्या अधिसूचनेन्वये साखरेची निर्यात तात्काळ प्रभावाने दि. ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यत (जे आधी येईल ते) बंदी घालण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने दि. १३ फेब्रुवारी, २०२६ अन्वये अतिरिक्त ५ लाख मे.टन साखरेच्या निर्यातीसाठी इच्छुकतेबाबत देशातील कारखान्यांना विचारणा केली होती. त्यानंतर कारखान्यांकडून मिळालेल्या विनंतीचा विचार करुन साखर हंगाम २०२५-२६ साठी इच्छुक साखर कारखान्यांना ८७,५८७ मे.टन अशा प्रकारे एकूण १५,८७,५८७ मे.टन साखर निर्यात कोटा देशभरातील कारखान्यांसाठी दिलेला होता. साखर निर्यातीबाबतचे धोरण केंद्र शासन स्तरावर ठरविले जाते.

(३) खरे नाही.

गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचे FRP अदायगीचे प्रमाण हे ९९.०२% आहे.

(४) मा.मुख्यमंत्री यांचे नेतृत्वाखाली नवी दिल्ली येथे मा.केंद्रीय मंत्री (गृह आणि सहकार) यांच्याकडे झालेल्या बैठकीत सहकारी साखर कारखान्या-कडील अडचणी विस्तृतपणे मांडल्या असून प्रत्येक अडचणींबाबत केंद्रशासनाकडून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेणेबाबत मा. केंद्रीय मंत्री (गृह व सहकार) यांनी मान्य केले आहे. त्यामुळे कारखान्यातून निर्मित साखरेला MSP दर वाढविणे. साखर कारखान्यामध्ये उत्पादित इथेनॉलचा दर व कोटा वाढविणे याबाबत केंद्र शासनास विनंती केली असून केंद्र शासनाकडे पाठपुरावा चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) खाजगी शाळांमधील रिक्त जागांबाबत**

**(१७)** * **३३३३४ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खाजगी शाळांमधील मोफत प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या १,०२,९०२ जागांपैकी सुमारे २०,८७४ जागा रिक्त राहिल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ७,८६३ खाजगी शाळांनी आरटीई अंतर्गत नोंदणी केली असतानाही चार प्रतिक्षा याद्या जाहीर झाल्यानंतर केवळ ८८,२२८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित होऊ शकले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक सत्र सुरू होऊन दोन महिन्यांहून अधिक कालावधी उलटल्यानंतरही मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त राहिल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागासवर्गीय घटकांतील हजारो विद्यार्थी शिक्षणाच्या संधीपासून वंचित राहीले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त जागा भरण्यासाठी विशेष प्रवेश फेरी आयोजित करणे, प्रवेश प्रक्रियेमधील तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करणे, शाळांना आवश्यक मार्गदर्शन करणे तसेच, प्रवेश नियमावली अधिक सुलभ व परिणामकारक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच आरटीई अंतर्गत रिक्त राहिलेल्या जागांमुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये आरटीई अंतर्गत २५ टक्के प्रवेशाकरिता १,०९,०७१ जागा उपलब्ध होत्या. शाळा निवडीच्या प्राधान्य क्रमानुसार १,०२,२०२ बालकांनी सोडतीद्वारे (लॉटरी) निवड झाली असून उर्वरित जागांसाठी पालकांकडून शाळा निवडीचा प्राधान्यक्रम देण्यात न आल्यामुळे सदरच्या जागांवरती सोडतीद्वारे बालकांची निवड झाली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे पारदर्शकपणे राबविण्यात येते. आरटीई प्रवेशाच्या पोर्टलवर बालकांना प्रवेशासाठी बालकांच्या पालकांकडून १० शाळा निवडीचे विकल्प घेऊन त्यातून सोडतीद्वारे (लॉटरी) मिळालेल्या शाळेत प्रवेश घेण्याबाबत पालकांना स्वातंत्र्य असल्यामुळे, आवडीची व सोयीची शाळा असेल तरच, पालक त्या शाळेत आपल्या बालकाचा प्रवेश निश्चित करतात. पालकांद्वारे प्रवेश न घेतल्यास ती जागा रिक्त राहून प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना रिक्त जागी प्रवेश घेण्यासाठी संधी देण्यात येते.

आरटीई प्रवेशाची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असल्याने पालकांनी त्यांच्या पाल्यासाठी प्रवेश न घेतल्यामुळे रिक्त राहणाऱ्या जागांवर कोणतेही प्रवेश ऑफलाईन पध्दतीने देण्यात येत नाहीत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात परीक्षा व्यवस्थापनात झालेली अनियमितता

**(१८) * ३२९५० श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे सन २०२५ च्या हिवाळी परीक्षांपैकी सुमारे ६०० हून अधिक तसेच एकूण जवळपास १२०० परीक्षांपैकी १९० पेक्षा अधिक परीक्षांचे निकाल माहे एप्रिल, २०२६ पर्यंत प्रलंबित राहिल्यामुळे विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षांचे अर्ज भरताना अडचणी निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाने परीक्षा व्यवस्थापनाचे काम पूर्वी प्रो. मार्क या कंपनीकडे सोपविले होते, तथापि सदर करार रद्द करून कोएम्प्ट एज्युटेक या कंपनीकडे परीक्षा संदर्भातील कामकाज देण्यात आले असून अद्याप विद्यार्थ्यांचा संपूर्ण डेटा सॉफ्ट कॉपीच्या स्वरूपात हस्तांतरित करण्यात आलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिवाळी परीक्षा दीड महिना उशिराने सुरू होणे, कोएम्प्ट कंपनीकडून निकाल जाहीर करण्यास होणारा विलंब तसेच, यासंदर्भात विद्यार्थी संघटनांनी आंदोलन करून आक्षेप नोंदविले असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम व चिंता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंपन्या, अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

मे. प्रोमार्क कंपनीने २०२५ पर्यंतच्या परीक्षांचा डेटा विद्यापीठास उपलब्ध करून दिला होता. तथापि,

विद्यापीठाला आवश्यक असलेल्या नमुन्यात (Format) डेटा उपलब्ध करून दिला नव्हता.
(३) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान झालेले नाही. तसेच कोणत्याही विद्यार्थ्याची शैक्षणिक संधी गमावलेली नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची पूर्ण काळजी घेऊन विद्यापीठाने सर्व आवश्यक कार्यवाही केली आहे.

(४) व (५) मे. प्रोमार्क कंपनीने विद्यापीठाला हव्या असलेल्या नमुन्यामध्ये (Format) डेटा उपलब्ध करून दिला नसल्याने सदर कंपनीकडे विद्यापीठाच्या तांत्रिक कक्षामार्फत पत्रव्यवहार सुरु आहे. तसेच संबंधितांस कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्याने बँक सेवा नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(१९)** * **४००४२ श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा (पीडीसीसी बँक) एक नियमित पगारी कर्मचारी बँकेत कार्यरत असतानाच, पुणे जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून निवडून येऊन लोकप्रतिनिधींचे पद भूषवत असल्याची बाब सहकार आयुक्तालय किंवा बँकेच्या प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचारी बँकेच्या कोणत्या शाखेत व पदावर कार्यरत आहे, सहकारी बँकेच्या सेवा नियमावलीनुसार किंवा 'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०' नुसार बँकेच्या कोणत्याही नियमित पगारी सेवकाला/कर्मचाऱ्याला बँकेच्या नोकरीत असताना सक्रिय राजकारणात भाग घेण्यास किंवा जिल्हा परिषदेसारखे सार्वजनिक लाभाचे पद भूषवण्यास परवानगी आहे काय,
(३) जर अशी परवानगी नसेल, तर संबंधित कर्मचाऱ्याने बँकेची दिशाभूल करून किंवा कोणतीही पूर्वपरवानगी न घेता हे पद भूषवल्याबद्दल बँकेने किंवा शासनाने सदर कर्मचाऱ्याविरुद्ध कोणती शिस्तभंगविषयक किंवा निलंबनाची कारवाई सुरू केली आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बँकेच्या निधीचा आणि जिल्हा परिषदेच्या आर्थिक व्यवहारांचा थेट संबंध पाहता, या पदाचा गैरवापर रोखण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्याला बँक सेवेतून बडतर्फ करुन बँकेतील गैरव्यवहार रोखण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) श्री.समीर काळुराम सुपे हे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वाडा/डेहणे या शाखेत डेव्हलपमेंट ऑफिसर (JM II) म्हणुन कार्यरत असून ते पुणे जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून निवडून आले आहेत.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सेवानियमातील नियम क्र. ४९ मध्ये बँकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० नुसार नोंदणी झालेल्या सहकारी संस्थेचे (या बँकेच्या सेवक संस्था वगळून व संबंधित सेवक ज्या गृहरचना संस्थेचा सभासद असेल अशी गृहरचना संस्था वगळून) निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहता येत नसून निवडणूकीस उभे राहवयाचे असल्यास त्याने आपल्या नोकरीचा राजीनामा दिला पाहिजे अशी तरतुद आहे.

बँकेच्या सेवा नियमावलीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये सहभागी होण्याबाबत प्रतिबंध नसल्याने सदर कर्मचाऱ्याने बँकेच्या कर्मचारी सेवा नियमाविषयक उल्लंघन केलेले नसल्याने या कर्मचाऱ्याविरूध्द शिस्तभंग कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यासह राज्यातील द्राक्ष व डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी आर्थिक फसवणूक

**(२०) * ४०३६८ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यासह नाशिक, सांगली, सोलापूर, पुणे आणि जळगाव या प्रमुख द्राक्ष व डाळिंब उत्पादक पट्ट्यांमध्ये परप्रांतीय आणि स्थानिक व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून माल खरेदी करून कोट्यवधी रुपयांचे पेमेंट न देता फसवणूक केल्याच्या घटनांमध्ये गेल्या दोन वर्षांत मोठी वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण राज्यात गेल्या दोन वर्षांत द्राक्ष व डाळिंब बागायतदारांची एकूण किती कोटींची फसवणूक झाली आहे तसेच याप्रकरणी राज्यभरात किती गुन्हे दाखल झाले आहेत, बनावट धनादेश देऊन पसार झालेल्या परप्रांतीय व्यापाऱ्यांना पोलीसांनी अटक केली आहे काय,

(३) असल्यास, थेट शेतातून होणारी 'शिवार खरेदी' ही कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या (APMC) थेट नियंत्रणात नसल्यामुळे व्यापारी विनापरवाना व विनानोंदणी माल उचलून शेतकऱ्यांना आर्थिक संकटात ढकलत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील फळबागायतदार शेतकऱ्यांना आर्थिक लुटीपासून वाचविण्यासाठी शासन 'कॅश अँड कॅरी' (बँक खात्यात पूर्ण पैसे जमा झाल्याशिवाय माल वाहतुकीस परवानगी नाही) हा नियम संपूर्ण राज्यात सक्तीचा करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, 'शिवार खरेदी' करणाऱ्या प्रत्येक स्थानिक व बाहेरील राज्यांतील व्यापाऱ्याला बाजार समिती आणि स्थानिक पोलिसांकडे नोंदणी व बँक गॅरंटी बंधनकारक करण्याबाबत कडक कायदा किंवा नियमावली लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यासह नाशिक, सांगली, सोलापूर, पुणे आणि जळगाव या प्रमुख द्राक्ष व डाळिंब उत्पादक पट्ट्यांमध्ये परप्रांतीय आणि स्थानिक व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून डाळींब व द्राक्ष खरेदी करून कोट्यवधी रुपयांचे पेमेंट न देता फसवणूक केल्याच्या तक्रारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, पुणे (ग्रामीण) व सोलापूर तसेच पणन संचालक कार्यालयास प्राप्त नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे नाही.

पणन संचालक कार्यालयाने दिनांक ०८.०५.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये कोणत्याही व्यापाऱ्यांनी, संस्थानी अथवा शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमालाच्या व्यापार करणाऱ्या इतर घटकांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ५ (ड) मध्ये नमूद परवान्याशिवाय शेतमाल खरेदी विक्रीचा व्यवसाय करु नये. अन्यथा त्यांचेविरुद्ध कायदेशिर कारवाई करण्यात येईल अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विकास आराखडयात पणन संचालकांची पूर्वपरवानगी न घेता केलेले फेरबदल

**(२१) * ४०३१०  डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पणन संचालनालयाने दिनांक २९ मे, २०१९ रोजी रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गट क्रमांक १०/६ मधील मुख्य आवाराच्या विकास आराखडयाला (ले-आऊट प्लॅन) मंजूरी देताना घालण्यात आलेल्या अटीनुसार विकास आराखडयाला स्थानिक सक्षम प्राधिकरणाची (रिसोड नगरपरिषद) अंतिम मंजूरी घेणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास आराखडयात कोणताही फेरबदल करण्यापूर्वी पणन संचालकांची पूर्व परवानगी आवश्यक असतानाही रिसोड कृषि उत्पन्न बाजार समितीने या अटींचे पालन केले नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यानुषंगाने विकास आराखडयात बदल करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगाव खंडेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीने दि.२५.५.२०२६ रोजी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने पणन संचालनालयाने दि.११.६.२०२६ च्या आदेशान्वये रिसोड कृषि उत्पन्न बाजार समितीने दि.१५.९.२०२५ रोजीच्या सभेत पारित केलेला ठराव क्र.५(१) रद्द केला आहे. तसेच बाजार समितीने मुख्य यार्ड मधील सर्व्हे नं.१०/२ मधील भूखंड व सर्व्हे नं.१०/६ मधील १ भूखंड असे एकुण ११ भूखंडाबाबत करण्यात आलेले भाडेपट्टा करारनामे रद्द करण्याची कारवाई करण्याबाबत आदेश दिले आहेत. तसेच, पणन संचालनालयाने दि.११.६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये दि.१३.१०.२०२५ च्या पत्रान्वये ११ भूखंड भाडेपट्याने देण्यात आलेली मान्यता रद्द केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खोंडशी (जि.सांगली) येथील नवीन बंधाऱ्याच्या उर्वरित कामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(२२) * ३७२११  श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील तीन तालुक्यांमधील हजारो शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारा खोंडशी येथील नवीन बंधारा (KT Weir) तब्बल रुपये ८० कोटी इतका निधी खर्चून उभारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य काम पूर्ण झाले असतानाही, या प्रकल्पाच्या शेवटच्या टप्प्यातील अत्यंत आवश्यक अशा कामांसाठी लागणारा केवळ रुपये ४ कोटी इतका निधी उपलब्ध न झाल्यामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प गेल्या दोन दशकांपासून (२० वर्षांपासून) अपूर्ण व वापराविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाची गंभीर दखल घेऊन हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी उर्वरित रुपये ४ कोटी इतका निधी तातडीने मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

खोडशी येथील नवीन द्वारयुक्त बंधाऱ्यासाठी मार्च, २०२६ अखेर पर्यंत रू.२२.४५ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

संकल्पन, दरसूचीतील बदल, प्रवाही पाण्यामुळे, प्रथम कंत्राटदार यांचे न्यायालयीन प्रकरण तसेच द्वितीय कंत्राटदार यांनी काम पूर्ण कण्यास असक्षमता दर्शविणे इ. करणांमुळे प्रकल्पाचे काम रखडले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) खोडशी बंधाऱ्याचे उर्वरित स्थापत्य काम पूर्ण करण्याकरीता रु.१.३१ कोटी किंमतीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

उर्वरीत यांत्रिकी कामासाठी रू.१.२८ कोटी व पूर्वरचित पुलासाठी रू. १.२८ कोटी अशा एकूण रू.२.५६ कोटी रकमेची आवश्यकता आहे. सदर प्रकल्पास सन २०२६-२७ या वर्षाकरीता आवश्यक निधी रू.३.११ कोटी रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

**(२३) * ४०२१० श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागातील अनेक विद्यार्थी इयत्ता आठवी उत्तीर्ण झाल्यानंतर शैक्षणिक सुविधांचा अभाव, वाहतूक व निवासाच्या अडचणी तसेच इतर कारणांमुळे इयत्ता नववी व दहावीच्या प्रवेशापासून वंचित राहत असल्याचे दिनांक १५ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समस्येच्या निवारणासाठी राज्यस्तरीय आदिवासी विकास आढावा समितीच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली पालघर जिल्हा परिषद कार्यालयात महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील तीन वर्षांत पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा, शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांमधून इयत्ता आठवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात इयत्ता नववीमध्ये प्रवेश घेतला असून किती विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले आहेत,
(४) तसेच पालघर जिल्ह्यातील एकही आदिवासी विद्यार्थी माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी शिक्षण व्यवस्थेतील आवश्यक सुधारणा, पायाभूत सुविधा, वसतिगृहे, वाहतूक सुविधा व इतर उपाययोजनांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) याबाबत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात श्री. विवेकभाऊ पंडीत, श्रमजीवी संघटना संस्थापक तथा अध्यक्ष, आदिवासी क्षेत्र आढावा समिती यांच्या अध्यक्षतेखाली दि. १४ मे, २०२६ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.
(३) सन २०२३-२४ यावर्षी पालघर जिल्ह्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, जिल्हा परिषद शाळा, आदिवासी विकास विभागाकडील शासकीय आश्रम शाळा व आदिवासी विकास विभागाकडील अनुदानित आश्रम शाळा यांमधील इयत्ता ८ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या १६,००० इतकी होती, तर सन २०२४-२५ या वर्षात उपरोक्त १६,००० विद्यार्थ्यांपैकी १०,०७१ इतक्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ९ वी मध्ये प्रवेश घेतल्याचे दिसून येते.

तसेच, सन २०२४-२५ या वर्षात कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, जिल्हा परिषद शाळा, आदिवासी विकास विभागाकडील शासकीय आश्रम शाळा व आदिवासी विकास विभागाकडील अनुदानित आश्रम शाळा यांमधील एकूण १७,५८१ इतके विद्यार्थी इयत्ता ८ वी मध्ये उत्तीर्ण झाले होते, तर उपरोक्त १७,५८१ विद्यार्थ्यांपैकी सन २०२५-२६ यावर्षी ११,४५४ इतक्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ९ वी मध्ये प्रवेश घेतल्याचे दिसून येते.
(४) पालघर जिल्ह्यामध्ये इयत्ता ८ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षणातील सातत्य टिकवून ठेवण्यासाठी व त्यांची गळती थांबविण्यासाठी नजीकच्या शाळेच्या क्षेत्रामध्ये किंवा हद्दीच्या आत शाळा उपलब्ध नाहीत अशा वस्त्यांमधील मुलांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत परिवहन सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.

तसेच पालघर जिल्ह्यातील व एकूणच संपूर्ण राज्यातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत याकरिता शासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शालेय विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तावृध्दी करण्यासाठी व इतर लाभ देण्यासाठी केंद्र पुरस्कृत मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठ्यपुस्तके योजना, मोफत गणवेश योजना, मानव विकास मिशनमार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना, मुलींना इ.१२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजना, विद्यार्थिनींसाठी कस्तुरबा गांधी रहिवाशी शाळा यांसारख्या इतर अनेक योजना राबविण्यात येत आहेत. तसेच, शाळांमध्ये स्मार्ट क्लासरुम यांसारख्या संकल्पना राबविण्यात येत आहेत. ज्या ठिकाणी शाळांचे अंतर वस्तीपासून लांब आहे, तेथील विद्यार्थ्यांना प्रवासासाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत प्रवासभत्ता देण्यात येत असतो. विद्यार्थ्यांना सुरक्षित व अनुकूल वातावरण निर्मिती करिता शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे, महिला शिक्षकांची नियुक्ती, मुलींकरिता स्वतंत्र व स्वच्छतागृहे, सॅनिटरी पॅड वितरण व मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण, नियमित आरोग्य तपासणी शिबिरे, ग्रामसभा व पालकबैठकांद्वारे जनजागृती, करिअर मार्गदर्शन व समुपदेशन, शाळाबाह्य मुलींची ओळख व पुनर्वसन, ई-लर्निंग साधनांचा वापर, इ. उपायोजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पूर्व विदर्भातील महत्त्वाकांक्षी गोसीखुर्द सिंचन प्रकल्प पूर्ण करणेबाबत**

**(२४) * ३६८७३ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील महत्त्वाकांक्षी ‘गोसीखुर्द सिंचन प्रकल्पा’चा मूळ मंजूर खर्च ३७२ कोटी रुपये असताना, नियोजनातील त्रुटी आणि प्रशासकीय विलंबामुळे तो आता २५ हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८८ साली भूमिपुजन होऊनही आज ४३ वर्षाचा कालावधी उलटून प्रकल्पाचे काम अपूर्ण आहे, सदर प्रकल्पाचे मुख्य धरण पूर्ण होऊनही वितरिका (Canal Network) तयार नसल्यामुळे नागपूर, भंडारा आणि चंद्रपुर या तीन जिल्ह्यातील सुमारे २.५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा महत्वाकांक्षी उद्देश असणारा गोसीखुर्द प्रकल्प प्रशासकीय विलंब, निधीचा अभाव, आणि तांत्रिक अडचणींमुळे अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या २६८ गावांमधील १४,९८४ कुटुंबांचे पुनर्वसन होऊनही त्यांना प्रकल्पाचा कोणताही प्रत्यक्ष लाभ मिळत नाही, याबाबत शासनाकडे काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ‘समर्थन’ या संस्थेने या प्रकल्पातील प्रशासकीय अनियमितता आणि उपसा सिंचन योजनांवर झालेला निष्फळ खर्च याकडे शासनाचे दिनांक २४ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान पत्राद्वारे लक्ष वेधले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पाच्या आराखड्यात वारंवार होणारे बदल आणि आर्थिक अनियमिततेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने हा प्रकल्प सन २०२७ पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे, अंशत: खरे आहे.

गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पास शासन निर्णय दिनांक २२.०५.२०२५ अन्वये रु.२५९७२.६९ कोटी किंमतीस चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दरसूचीतील वाढ, भूसंपादन कायदा, २०१३ नुसार वाढीव दर, पुनर्वसन मागण्या, वनजमीन संपादन, स्वामित्व शुल्क, वस्तू व सेवा कर, प्रत्यक्ष संकल्पन, स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार नवीन उपसा सिंचन योजना इ. प्रमुख कारणांमुळे किंमतीत वाढ झाली आहे.

(२) हे, अंशत: खरे आहे.

गोसीखुर्द प्रकल्पाची २,५९,५१२ हे. आर. सिंचन क्षमता असून यापैकी २,११,८८८ हे. आर. (८२%) सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. प्रकल्प जून, २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) हे, अंशत: खरे आहे.

या प्रकल्पामुळे ८५ गावे बाधित झाली असून १४,९८४ बाधित कुटुंबांपैकी १२,६३८ कुटुंबांचे स्थलांतरण झालेले आहे. उर्वरित २,३४६ कुटुंबे प्रकल्पाचे पूर्ण संचय पातळी २४५.५०० मी. तलांकांचे वर स्थित आहेत. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय दि.०२.०२.२०१० व शासन निर्णय दि.१८.६.२०१३ च्या परिपत्रकाप्रमाणे रु.१,१९९ कोटीचे विशेष पॅकेज देण्यात आले असून, त्याचे वाटप महसूल विभागामार्फत करण्यात येत आहे. पुनर्वसित गावठाणाला १८ नागरी सुविधा पुनर्वसन कायद्यानुसार देण्यात आले आहेत. तसेच संपादित केलेल्या जमिनीचा संपूर्ण मोबदला भूधारकांना देण्यात आला आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) गोसीखुर्द प्रकल्पास चतुर्थ सुधारित प्रशासकिय मान्यता दि. २२.०५.२०२५ रोजी प्रदान करण्यात आली आहे. प्रकल्पामध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले नसल्यामुळे चौकशीबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) गोसीखुर्द प्रकल्पाची २,५९,५१२ हे. आर. सिंचन क्षमता असून यापैकी २,११,८८८ हे. आर. (८२%) सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तसेच प्रकल्प पूर्णत्वाचे नियोजन जून, २०२८ पर्यंत करण्यात आले आहे.

-----------------

**बदलापूर (जि.ठाणे) येथील अल्पवयीन पीडित मुलीच्या शिक्षणाबाबत**

**(२५) * ३७९७६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील अल्पवयीन पीडित मुलीच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी शासनाने स्वीकारण्याची घोषणा केली असतानाही संबंधित शाळेकडून तिच्या पालकांकडे शिक्षण शुल्क भरण्याबाबत तगादा लावण्यात आल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीडित मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याबाबतचा अधिकृत शासन आदेश अथवा आवश्यक निधी संबंधित शाळा व शिक्षण विभागाकडे अद्याप प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर मुलीचे शिक्षण कोणत्याही परिस्थितीत खंडित होऊ नये यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणे, संबंधित शाळेने शुल्कासाठी कोणताही तगादा लावू नये असे निर्देश देणे तसेच, पीडित विद्यार्थिनीच्या शिक्षणाची सातत्याने जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील शाळेमधील पीडित विद्यार्थिनींच्या इयत्ता १० वी पर्यंतच्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश शुल्काचा खर्च एक विशेष बाब म्हणून त्या-त्या शैक्षणिक वर्षामध्ये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत अदा करण्याबाबत शासन निर्णय, दि. १४.०५.२०२६ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

पीडित विद्यार्थिनींचे इयत्ता ज्युनिअर के. जी. ते १ ली पर्यंतचे प्रवेश शुल्क संबंधित शाळांना अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केज (जि.बीड) तालुक्यातील पंचायत समितीतंर्गत समग्र शिक्षा अभियानाच्या हंगामी अनिवासी वसतिगृह योजनेत झालेला आर्थिक गैरव्यवहार**

**(२६) * ४०६२२ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत समग्र शिक्षा अभियानाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांच्या पाल्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी हंगामी अनिवासी वसतिगृहे चालविण्यात येत असून सदर योजनेत बोगस विद्यार्थ्यांची नोंद दाखवून शालेय व्यवस्थापन समितीला निधी न देता गटशिक्षणाधिकारी कार्यालयातून थेट निधी काढण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृह सुरू करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव शाळा व्यवस्थापन समितीमार्फत मागविण्याऐवजी केज तालुक्यात परस्पर गटशिक्षणाधिकारी कार्यालयातून जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले असून संबंधित प्रस्तावांवर शाळा व्यवस्थापन समितीच्या स्वाक्षऱ्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची पटसंख्या व प्रस्तावातील लाभार्थी संख्या यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळून आली असून तपासणी पथकाच्या अहवालात फेरफार करून खोटी व बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली तसेच सन २०२५-२६ मध्ये सुमारे रु.१ कोटी २९ लाख ७५ हजार ५३६ इतक्या निधीचा अपहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा योजनेच्या माध्यमातून ता. केज, जि. बीड अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये हंगामी वसतिगृहांच्या अंमलबजावणीसाठी गटशिक्षणाधिकारी व गटसमन्वयक यांच्या संयुक्त खाती PFMS प्रणालीद्वारे निधी वितरित करण्यात आला होता. सदर PFMS प्रणाली अंतर्गत शाळा व्यवस्थापन समितीचे खाते नसल्यामुळे शाळा व्यवस्थापन समितीकडून प्राप्त देयकानुसार खर्च करण्यात आला आहे. शाळा व्यवस्थापन समितीच्या स्वाक्षऱ्या असलेले प्रस्ताव मागविण्यात आले होते व त्यानुसार जिल्हास्तरावरून प्रस्तावांना मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच, विद्यार्थ्यांच्या बायोमेट्रिक उपस्थितीनुसार संबंधित वसतिगृहांना बील अदा करण्यात आलेले आहे.

(४) व (५) ता. केज, जि. बीड येथील हंगामी वसतिगृह योजनेतील आर्थिक भ्रष्टाचाराबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हास्तरावरून त्रिसदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, तक्रारदार यांनी दि.२३.०३.२०२६ रोजीच्या निवेदनाद्वारे असे कळविले आहे की, त्यांनी दि.१६.०१.२०२६ रोजी व दि.०५.०२.२०२६ रोजीच्या तक्रारींच्या अनुषंगाने केज तालुक्यातील ऊसतोड मजुरांच्या बोगस हंगामी वसतिगृह संबंधित सर्व अभिलेखे गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून पाहिले असता, त्यामध्ये कोठेही गैरव्यवहार अथवा अनियमितता झालेली दिसून आलेली नाही, असे लेखी म्हणणे सादर केले आहे.

तथापि, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने आढळलेल्या काही अंशी अनियमिततेबाबत जिल्हास्तरावरून संबंधित दोषींवर कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२७) * ३३३३७ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (MSBTE) तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परदेशातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध देशांतील संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपक्रमामुळे राज्यातील स्थानिक उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ परदेशात गेल्यामुळे राज्यातील उद्योगांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जपानी, जर्मन, रशियन आदी परदेशी भाषा प्रशिक्षणासाठी आवश्यक असणारा खर्च शासनामार्फत करण्यात येणार आहे की विद्यार्थ्यांकडून शुल्काच्या स्वरूपात आकारण्यात येणार आहे,

(४) असल्यास, परदेशातील रोजगाराच्या संधींचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांकडून खासगी संस्था किंवा प्रशिक्षण केंद्रांकडून अवाजवी शुल्क आकारले जाण्याची अथवा आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता लक्षात घेता अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच, दरवर्षी १०,००० विद्यार्थ्यांना परदेशातील रोजगारासाठी तयार करण्याच्या अनुषंगाने संबंधित देशांतील व्हिसा धोरणे, कामगार कायदे व रोजगार उपलब्धतेतील बदलांचा विचार करून विद्यार्थ्यांच्या रोजगार सुरक्षिततेबाबत तसेच राज्यातील सुशिक्षित बेरोजगार डिप्लोमा धारकांना महाराष्ट्रातच रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (MSBTE) तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परदेशातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणत्याही अन्य देशांतील संस्थांशी सामंजस्य करार केलेले नाहीत.
(३) व (४) जपानी व जर्मन या परदेशी भाषा प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) व मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. सदर भाषेचे प्रशिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना ऐच्छिक स्वरुपात देण्यात आलेली आहे. या प्रशिक्षणाचा खर्च शासनामार्फत करण्यात येणार नसून सदर प्रशिक्षण ऐच्छिक असल्याने विद्यार्थ्यांकडून मुंबई विद्यापीठाचे निर्धारित शुल्क आकारण्यात येणार आहे.

तसेच, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (CII) यांचेसोबत जपानी व जर्मन भाषेसाठी सामंजस्य करार करण्यात आला असुन यावरील प्रशिक्षणाचा आर्थिक भार विद्यार्थ्यांवर पडू नये म्हणून सीएसआर (CSR) निधी अथवा अंशतः सवलत शुल्काचे प्रारूप (Model) विचारात घेतले जात आहे.

रशियन भाषेबाबत मंडळाकडून कोणत्याही संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आलेला नाही.
(५) महाराष्ट्रातच रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने खालील उपाययोजना केल्या आहेत.

(अ) नविन अभ्यासक्रमामध्ये महाराष्ट्रात पदविका विद्यार्थ्यांना १२/१६ आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण समाविष्ट केले आहे.

(ब) पदविका शाखेच्या नवीन अभ्यासक्रमांतर्गत Emerging Trends, Electrical Vehicles, AI, Solar Technology इ. विषयांचा अंतर्भाव रोजगार निर्मितीच्या दृष्टीकोनातून केला आहे.

(क) महाराष्ट्रातील सर्व तंत्रनिकेतनांमध्ये Training & Placement Cell स्थापित करण्यात आला असुन सदर Cell मार्फत पदविकानंतर विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याकरिता सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.
(६) लागू नाही.

-----------------

## राज्यातील हापूस आंब्याच्या आयातीवर जपानकडून घालण्यात आलेली बंदी

**(२८) * ४००६८ श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जपान देशाने माहे मार्च, २०२६ पासून राज्यातील प्रसिद्ध 'हापूस' आणि 'केसर' आंब्याच्या आयातीवर पूर्णपणे बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जपानच्या 'क्वारंटाईन' अधिकाऱ्यांनी भारतातील 'वेपर हीट ट्रीटमेंट' प्लांटमधील त्रुटी आणि कीड नियंत्रणाच्या कडक निकषांचे कारण देऊन बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बंदीमुळे राज्यातील आंबा उत्पादक शेतकरी आणि निर्यातदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होवून त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम शासनाकडून दिली जाणार आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जपान सरकारसोबत चर्चा करून ही बंदी उठवण्यासाठी तसेच, केंद्राच्या 'अपेडा' संस्थेच्या माध्यमातून निर्यात सुविधांमधील तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने कोणत्या तातडीच्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या नॅशनल प्लांट प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन (NPPO) यांच्या दि.०८/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये देशातील सर्व पॅकहाऊसमधून जपानला आंबा निर्यात तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.
(२) जपानी प्लांट क्वारंटाईन अधिकारी यांनी देशामधील आंबा हंगाम २०२६ करिता दि. १८ मार्च ते २४ मार्च २०२६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे वाशी, नवी मुंबई, येथील तसेच, तिरुपती व लखनौ येथील व्हेपर हीट ट्रीटमेंट प्लांटची तपासणी केली असता, त्यांना तिरुपती व लखनऊ येथील (VHT) केंद्रांमध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या नॅशनल प्लांट प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन (NPPO) यांच्या दि. ०८/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये देशातील सर्व पॅकहाऊसमधून जपानला आंबा निर्यात तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. मात्र, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील व्हेपर हीट ट्रीटमेंट केंद्रामध्ये कोणतीही त्रुटी अथवा आक्षेप नोंदविण्यात आलेले नाहीत.
(३), (४) व (५) जपान येथे भारतातून आंब्याची निर्यात मर्यादित आहे. जपानी निरीक्षकांनी नोंदविलेल्या त्रुटी व निरीक्षणांबाबत दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी कृषी भवन, नवी दिल्ली येथे भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागामार्फत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. भारत सरकारमार्फत जपानी अधिकाऱ्यांशी समन्वय साधून आवश्यक सुधारात्मक कार्यवाही करण्यात येत असून, लवकरात लवकर जपान बाजारपेठ पुन्हा खुली करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. इतर विकसित देशांना आंब्याची निर्यात सुरळीत सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.